क्रमांक : १२०८ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २३ जानेवारी, २०२४.

: : **परिपत्रक** : :

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, काही अधिकारी व कर्मचारी यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल अद्यापपर्यंत "क-१" आस्थापना कक्षास प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षाच्या कार्यमूल्यमापन अहवालावरील कार्यवाही पूर्ण करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. स्वयंमूल्यनिर्धारण, प्रतिवेदन, पुनर्विलोकन आणि संस्करण ही प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांची वैयक्तिक तसेच सामुहिक जबाबदारी असून ती अत्यंत कर्तव्यदक्षपणे पार पाडणे गरजेचे आहे.

ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल स्वयंमूल्यनिर्धारण केले नसतील त्यांनी ते स्वयंमूल्यनिर्धारण करुन तात्काळ "क-१" आस्थापना कक्षास सादर करावे, तसेच ज्या अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदनाकरिता प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे प्रलंबित असतील त्यांनी सदरहू कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदन करुन पुनर्विलोकनाकरिता तात्काळ "क-१" आस्थापना कक्षास सादर करावेत, तसेच ज्या अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल पुनर्विलोकन अधिकारी यांच्याकडे पुनर्विलोकनाकरिता प्रलंबित आहेत, त्यांनी सदरहू कार्यमूल्यमापन अहवाल पुनर्विलोकन करुन तात्काळ "क-१" आस्थापना कक्षास सादर करावेत.

सदरची कार्यवाही सोमवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ रोजीपर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे. ज्या अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल स्वयंमूल्यनिर्धारण, प्रतिवेदन व पुनर्विलोकन करुन सोमवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ रोजीपर्यंत "क-१" आस्थापना कक्षास प्राप्त होणार नाहीत त्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यमूल्यमापन अहवालासंदर्भात शासन निर्णयानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

आदेशानुसार,

(सुभाष नलावडे)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

\\MLS-DATASERVER\C Branch\1402\MLS C-111\D drive\backup 14jan2020\2024\CR\परिपत्रक docx

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) मा.सचिव - १ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) मा.सचिव - २ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.